**(CNRN0MHSN060006722018)**

## नि. दि. दा. क्र. ७६/२०१८ मधील नि. ३१ वरील आदेश
## ( शकुंतला शिरोटे वि. गुलाब डांगे )

१. प्रस्तुतच्या अर्जाअन्वये वादी यांनी त्यांचेविरुध्द प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दाखल केलेल्या प्रतिदावेस या अर्जासोबत दाखल केलेली कैफियत समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी यांनी दि.०३/०२/२०२० रोजी कौंटर क्लेमची कोर्ट फीची त्रुटी पूर्ण करून त्यांचा कौंटर क्लेम दाखल केला आहे. त्यानंतर पुढील तारीख दि.२६/०३/२०२० देण्यात आली. दरम्यान दि.२६/०३/२०२० पूर्वीपासून लॉकडाऊन सूरू झाल्याने वादीला मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही व वादीस कौंटर क्लेमच्या अर्जास कैफियत देण्यास ४६ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादीनी जाणीवपुर्वक कैफियत देणेस विलंब केलेला नाही. त्यामुळे वादीने त्याची कैफियत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी नि. ३१ च्या पाठीमागे स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचे अर्जामधील कथन खोटे असून यापूर्वी दि.०३/०२/२०१९ पासून वादीच्या कथनाप्रमाणे मुदत मिळणेस अर्ज दिलेला नाही. वादीचे कारण संयुक्तीक नाही. सबब अर्ज मंजूर केल्यास वादीवर जबर कॉस्ट बसविणेची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला व म्हणणे वाचले. दावेचे रेकॉर्ड तपासले. दि.०३/०२/२०२० रोजी प्रतिवादीने त्याच्या प्रतिदावेकरीता आवश्यक असलेल्या व कोर्ट फी स्टॅम्प जमा

केल्यानंतर प्रस्तुत कामाची नेमली तारीख २६/०३/२०२० ही प्रतिदावेस वादीमार्फत कैफियत दाखल करण्याकरता नेमली गेली. परंतु दि.२४/०३/२०२० ते दि.०६/०६/२०२० पर्यंत केंद्र शासन व राज्य शासन यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात व देशभरात बंदी आदेश, संचारबंदी आदेश जारी केल्याने न्यायालयाचे कामकाज बंद होते. तसेच सदर बंदी काळात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Suo Moto Writ Petition (Civil) No. 3/2020 अन्वये बंदी आदेश उठेपर्यंत मुदतीचा कालावधी वाढवून दिलेला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादींचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Urmila Parashram Koli

Digitally signed by Urmila Parashram Koli
Date: 2020.06.20 17:27:55 +0530

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. १९/०६/२०२० २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. U. Nadaf |
| Court | : | II[nd] Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 19/06/2020 |
| Judgment/Order uploaded on | : | 19/06/2020 |